# पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - 07252-232134.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.


क्रमांक:पोअवा/प्र.लि आस्था/पोलीस भरती-2022/अनुकंपा/पोशि-नियुक्ती/1114/2023, वाशिम. दिनांक 16 FEB 2023

## आ दे श

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस अधीक्षक, वाशिम आस्थापनेवर घेण्यात आलेल्या पोलीस शिपाई भरतीमध्ये अनुकंपा तत्वावर निवड करण्यांत आलेल्या खालील नमुद उमेदवांर यांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी तपासणी मध्ये पात्र ठरल्याने त्यांची पोलीस शिपाई या पदावर मुंबई पोलीस नियमावली 1959 मधील नियम क्र.78 चे तरतुदीनुसार अस्थाई व तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपर्यंत वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर :- एस-7: 21700-69100/- अधिक विशेष वेतन रु.750/-, आणि त्यावर देय असलेले अनुज्ञेय भत्ते यामध्ये ते पोलीस मुख्यालय, वाशिम येथे कर्तव्यावर हजर होतील त्या तारखेपासुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन नियुक्ती करण्यात येत आहे.

1.पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती ही अस्थाई, तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असून आपल्या सेवेची आवश्यकता न भासल्यास आपणांस कोणतेही कारण न दाखविता व पूर्व सुचना न देता सेवतून कमी करण्यात येईल.

2.महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन आदेश क्रमांक आरसीटी-0311/प्रक्र/228/पोल-5-अ दिनांक 16/6/11 अन्वये निर्गमीत केलेल्या तरतुदी नुसार उमेदवारांची पात्रता कोणत्याही स्तरावर किंवा प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी नियमानुसार कमी असल्याचे किंवा उमेदवार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली पात्रता पूर्ण करीत नसल्याची आढळून आल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

3.शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.चापअ-1008/प्रक्र-57/2008/16-अ, दिनांक 30/9/08 प्रमाणे पूर्व चरित्र व वर्तणूक पडताळणी बाबत भरुन दिलेल्या सांक्षाकंन फॉर्म नमून्यामध्ये खोटी माहिती पूरविली आहे. किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे सेवाकाळात निदर्शनास आल्यास आपण सेवा समाप्त होण्यास पात्र ठराल व आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा कोणतीही पूर्व सुचना न देता समाप्त (Terminate) करण्यांत येईल. आणि आपण कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहाल.

4.आपले विरुध्द फौजदारी खटले न्यायप्रविष्ट आहेत किंवा नैतिक अध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपण कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहाल.

5.आपण सादर केलेली प्रमाणपत्रे, समांतर आरक्षणासाठी सादर केलेली प्रमाणपत्रे (जसे-होमगार्ड, माजी सैनक, प्रकल्पग्रस्त किंवा खेळाडु असल्याचे) तसेच जात/प्रवर्ग, शैक्षणिक पात्रता, जन्मतारखेचा दाखला ई. प्रमाणपत्र पडताळणीमध्ये असत्य अथवा अवैध असल्याचे आढळुन आल्यास आपणास कोणतीही पुर्वसुचा न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करुन कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

6.पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास महाराष्ट्र पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम-2011 प्रमाणे या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल. विहीत परिक्षा जर चार संधीमध्ये उत्तीर्ण झाले नाही तर सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतवाढी अनुज्ञेय असणार नाहीत.

7.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, ग्र.मभाप-1087/14/सिआर-287/20, दिनांक 30.12.1987 मधील तरतुदीनुसार मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर त्या संबंधी केलेल्या नियमानुसार परिक्षा उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

8.शसन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण/1017/3843/प्र.क्र.469/पोल 5ब, दि.26/10/2017 अन्वये पोलीस शिपाई पदावर उमेदवारास ज्या घटकात नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्या घटका व्यतिरिक्त इतर पोलीस घटकात 8 वर्ष सेवा पुर्ण झाल्या शिवाय बदली करत येणार नाही.

9.शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अनयो-1005/126/सेवा-4, दिनांक 31.10.2005 अन्वये नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना आपणास लागु राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम 1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण नियम-1984) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

10.पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मासिक चाचणी (Pshychological Test) घेण्यात येईल. सदर चाचणीत आपण अपात्र ठरल्यास सेवा समाप्त करण्यांत येईल.

11.महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-2011 मधील नियम 12 नंतर नव्याने नियम 13 (संगणक हाताळण्याचे प्रमाणपत्र

धारण करणे) अंतर्भुत करण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीसाठी उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचलनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- प्रशिक्षण 2000/ प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19 मार्च, 2003 अन्वये नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करुन सादर करणे आवश्यक राहील अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

12.महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन ) नियम 2005 नुसार उमेदवारास हयात असलेल्या अपत्यांची संख्या 2 पेक्षा अधिक असेल तर दिंनाक 28 मार्च 2005 व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे सदर पदासाठी उमेदवारास अपात्र ठरवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

13.पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस नियमावली 1959, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम 1956 व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागु होतील.

14.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सीबीसी-10/2004/प्रक्र-570/मावक-5, दिनांक 16 मे 2007 प्रमाणे खुल्या प्रवर्गातुन शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीनंतर कालांतराने मागासवर्गीय आरक्षणाचे फायदे मिळविण्यासाठी ज्या तारखेला जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करेल त्या तारखेपासुन पुढे आरक्षणाचे फायदे देय ठरतील.

15.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि. 12.12.2011 अन्वये मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता 6 महिण्यात (नेमणुक आदेशापासुन 6 महिण्याचे आत) सादर करणे आवश्यक राहील. दिलेल्या मुदतीपर्यंत सादर केल्यास किंवा जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कोणतेही कारण न दाखविता सेवेतुन कमी करण्यात येईल.

16.पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास व सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडुन प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च, प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्यासहीत संबंधीत उमेदवारांकडुन वसुल करण्यात येईल. अशा प्रकारचे बंधपत्र (बॉन्ड/हमीपत्र) आपण भरुन दिलेले आहे.

17.पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, 1999, भाग-3 मधील नियम 40 व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

18.सध्या पोलीस विभागात वाहन चालकाचे स्वतंत्र्यरितेने पदे भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यावर संबंधीत पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

19.महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम- 2011 मधील नियम 3(1)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता नियुक्ती करण्यात आलेल्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 2(21) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करण्या-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत हा परवाना धारण न केल्यास आपली निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल, याबाबतचे बंधपत्र(हमीपत्र) आपण या कार्यालयास सादर केले आहे, याची नोंद घ्यावी.

20.तसेच या अनुषंगाने वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना / आदेश उमेदवारास बंधनकारक राहतील व त्याबाबत त्यांना पालन करावे लागेल व कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | सामाजिक प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण | वाशिम जिल्हा पोलीस दलाचा बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|
| 1. | निलेश रमेश राठोड | बंजारा/विजाअ | खुला | अनुकंपा | 649 |
| 2. | मंगेश आदीनाथ मापारी | कुणबी/ईमाव | खुला | अनुकंपा | 672 |
| 3. | गणेश दिलीप लांडकर | कुणबी/ईमाव | खुला | अनुकंपा | 674 |
| 4. | शुभम कैलास राठोड | बंजारा/विजाअ | खुला | अनुकंपा | 723 |
| 5. | आकाश विजय गायकवाड | मातंग/अजा | खुला | अनुकंपा | 792 |

( बच्चन सिंह, भापोसे )
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

1. निलेश रमेश राठोड (भ्रमणध्वनी क्रमांक-7020005255).
राहणार- रा शिवाजी नगर, वाशिम जि.वाशिम
2. मंगेश आदीनाथ मापारी (भ्रमणध्वनी क्रमांक-8788259312)
राहणार- गाडगेनगर, मालेगांव जि.वाशिम
3. गणेश दिलीप लांडकर (भ्रमणध्वनी क्रमांक-9890858449).
राहणार- आगीखेड, ता.पातुर जि.अकोला
4. शुभम कैलास राठोड (भ्रमणध्वनी क्रमांक-8605859497).
राहणार- शेगी ता.मंगरुळपीर जि.वाशिम
5. आकाश विजय गायकवाड (भ्रमणध्वनी क्रमांक-7774040421).
राहणार- अनसिंग ता.जि.वाशिम

**मार्फत** :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम.

2/- वर नमुद उमेदवार यांनी सदरचे आदेश प्राप्त होताच राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम यांचेकडे खालील साहित्यासह त्वरीत हजर व्हावे.

**साहित्य** :- ताट,वाटी,ग्लास,टिफीन बॉक्स,आंथरुण,चादर,बकेट व आपणांस आवश्यक असलेले इतर साहित्य खरेदीसाठी पुरेसे पैसे स्वत:कडे ठेवावेत. तसेच मेस अग्रीम रु.5000/- पोलीस मुख्यालय, वाशिम येथे जमा करण्याकरीता सोबत आणावेत. तसेच उमेदवारांचे बँकेत खाते उघडण्याकरीता त्यांनी स्वत:चे 4 पासपोर्ट साईजचे फोटो तसेच आयडीप्रुफ करीता आधारकार्डची सत्यप्रत, किंवा राशनकार्डची सत्यप्रत किंवा ड्रायव्हिंग लायसन्स सोबत आणावेत. तसेच मुलभुत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम हा बराचसा आॅनलाईन पध्दतीने असल्याने प्रशिक्षणार्थी यांनी टॅब किंवा लॅपटॉप स्वत: आणणे आवश्यक आहे.

**प्रत** :- 1) पोलीस उपअधिक्षक (गृह) वाशिम.
2) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय वाशिम.

2/- रापोनि., यांनी वरिल उमेदवारांना कर्तव्यावर हजर करुन घेऊन त्यांचे हजर झाल्याचा दिनांक आणि वेळ या कार्यालयास न चुकता त्वरीत कळवावा. तसेच वर नमुद उमेदवारांना सरंजाम व किट साहित्य पुरवावेत. उमेदवाराकडुन मेस अग्रीम रु.5000/- स्विकारुन ती रक्कम मेस अग्रीम खाली जमा करावी. पुरुष व महिला उमेदवारांची निवास व्यवस्था वेगवेगळी व सुरक्षीत करावी. तसेच उमेदवारांचे बँकेचे बचत खाते उघडण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- कार्यालय अधिक्षक/प्रमुख लिपीक लेखा शाखा/प्रमुख पत्रव्यवहार शाखा/अनुकंपा लिपीक/सहाय्यक लेखा अधिकारी, लेखा शाखा/वेतन लिपीक-2(दो प्रतीत)/ प्रवासभत्ता लिपीक/भ.नि.नि.लिपीक/शासकीय निवासस्थान लिपीक/वस्त्र भांडारपाल,पो.मु.वाशिम/पेंशन लिपीक/पोलीस कल्याण लिपीक/प्रंबधक शाखा/संगणक विभाग/आस्थापा लिपीक-2,3,6/डि.पी.जी.लिपीक यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

**प्रत सविनय सादर** :-

1) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
2) मा. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
3) मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.